

१

# ।। ते हे माझी माया तरले ।।

**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।**
**मामेव ये प्रपंद्यते मायामेता तरंतिते।। १४।।**

**अर्थ :** अतिदिव्य आणि त्रिगुणात्मक अशी ही माझी माया दुस्तर आहे. जे मलाच शरण येतात ते ही माया तरून जातात.

संतसज्जन भाविक भक्तहो, सातव्या अध्यायातील - अर्थात या श्रीमद् गीता-ज्ञानेश्वरीच्या-चौदावा श्लोक आणि त्याचा गद्य अर्थ आताच आपण ऐकलात. या श्लोकातील गुह्यतम गुह्य प्रगट करीत असताना संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींनी ओवी क्र. ६८ ते १०२, अशी पस्तीस ओव्यांची अमृतरूपी मेजवांनी जिवात्म्यांना दिली आहे. त्यातील शेवटची ओवी अशी आहे -

**येणे उपाये मज भजले। ते हे माझी माया तरले।**
**परि ऐसे भक्त विपाईले। बहुवस नाही ।। १०२।।**

**अर्थ :** या उपायांनी जे माझी भक्ती करतात, तेच माझी ही माया तरून जातात. परंतु असे भक्त विरळा, फार नाहीत.

भक्तहो, या श्रीमद् गीता - ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायातील हा चौदावा श्लोक - त्याचे सार ध्वनित असलेली ही १०२ क्रमांकाची ओवी - तीमधील क्र. २ चा चरण 'ते हे माझी माया तरले' - आजच्या आपल्या प्रवचन सेवेचा विषय आहे.

या चरणातील 'ते' म्हणजे जे मलाच शरण येतात व अनन्य भावाने माझी भक्ती करतात. 'हे माझी माया' या तीन शब्दात मायेचे दुस्तर स्वरूप दिव्य भव्यता पार करण्यास अतिशय कठीण. हे सारे अभिप्रेत आहे. चरणाच्या शेवटच्या शब्दात 'तरले' असे सांगितले आहे. म्हणजे बुडाले नाहीत, वाचले. भवपार गेले. सायुज्य मुक्ती पावले असा त्याचा अर्थ आहे.

चौदाव्या श्लोकावरील नदीच्या रूपकाने मायेचे चौतीस ओव्यांत अप्रतिम विश्लेषण केले आहे. त्यानंतर समारोपपर अशी पस्तीसावी ओवी आहे.

या महाराष्ट्र भूमीचे पुण्य इतके अमाप की संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या रूपाने अध्यात्म ज्ञानसूर्याचा अवतार या भूमीवर झाला. त्या दिव्यज्ञानाचा प्रकाश दृश्यादृश्य अशा संपूर्ण विश्वास लाभला. या ज्ञानसूर्यास अस्तच नसल्याने ज्ञानप्रकाश शतकानुशतके मिळत राहिला. मिळत आहे. पुढेही अनंत काळ तो मिळतच राहील. आपणही अत्यंत भाग्यशाली आहोत. सध्या आपण त्या अमृतमय प्रकाशात न्हात आहोत. ज्ञानामृताचे प्राशन करीत आहोत. या श्री ज्ञानेश्वरमाऊलीरूपी ज्ञानसूर्यास अनंत नमस्कार. अनंत वंदन.

श्रीमद् गीता ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायात भगवंतांनी आपणास ज्ञान विज्ञान योग सांगितला आहे.

संत सज्जनहो, ओवी क्र. ६८ ते १०२ या पस्तीस ओव्यांपैकी पहिल्या पंधरा ओव्यांमध्ये, माऊलींनी मायेचे स्वरूप मायानदीच्या रूपकाच्या रूपाने अत्युत्कृष्ट रीतीने विशद केले आहे.



मायानदीचे वर्णन करीत असताना ज्ञानेश्वर माऊलींच्या परमेश्वरी प्रतिभेचा अनुपम साक्षात्कार या ओव्यांमधून आपणास घडतो.

मायानदी अथवा माया तरुन जाण्यास किती अवघड आहे, हे विषद करून झाल्यावर जीवात्मे स्वत:च्या अनेक प्रयत्नांनी, ही मायानदी तरुन जाण्याचे कोणकोणते प्रयत्न करतात आणि ते सर्व प्रयत्न कसे विफल होतात त्याचे सुयोग्य वर्णन त्यापुढील नऊ ओव्यांमधून आले आहे.

जिवाचे मायानदी पोहून पैलतिरास जाणे कसे अशक्य आहे, हे निरनिराळ्या उपमा देऊन पुढील सहा ओव्यांत कथन केले आहे.

आणि ही दुस्तर मायानदी तरुन जाणारे भवजलतरणपटू असे कोण आहेत, ते अखेरीच्या पाच ओव्यांमधून सांगितले आहे. ते, मायानदी तरुन जाणारे श्रेष्ठ जलतरण वीर कोणत्या अमर्याद सामर्थ्याने मायानदी ओलांडतात हे सांगून शेवटी असे महावीर अगदी थोडे आहेत, असे स्पष्ट केले आहे.

अशा रीतीने माया म्हणजे काय, ती किती दुस्तर आहे, तिच्या मगरमिठीतून सुटण्यासाठी जे जे उपाय करावेत ते ते अपाय कसे ठरतात, जिवाच्या सामर्थ्यांने मायेचा निरास करणे कसे अशक्यप्राय आहे आणि अखेरीस माया तरुन जाण्याचे रामबाण उपाय असे मायासंबंधी सारेकाही या पस्तीस ओव्यांत स्पष्टपणे, उघडपणे तसेच काही ठिकाणी गूढार्थांनेही सांगितले आहे.

**आता महदादि हे माझी माया। उतरोनिया धनंजया।**
**मी होईजे हे आया। कैसेनी ये?।।६८।।**

आता महततत्वादि ही माझी माया पार उतरून मद्रूप होणे कसे साध्य होईल?

भक्तजनहो, या श्रीमद् गीता ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायाच्या आरंभी पंचमहाभूते, मन, बुद्धी, अहंकार, सत्व, रज, तम हे त्रिगुण

आदिंनी युक्त अशा मायेचे स्वरूप वर्णिले आहे आणि ती माया ओलांडण्यास अतिशय कठीण आहे. ही मायानदी तरुन माझ्या स्वरूपात कसे विलिन होता येईल, हे सांगण्यास, भगवंतांनी येथे सुरुवात केली आहे. ते सांगत असतानाच माऊली ज्ञानेश्वरांनी पुढील ओवीत मायानदीचे उगमस्थान सांगितले आहे. तिच्या उगमाबरोबर काय काय निर्माण झाले तेही कथन केले आहे.

**जिये ब्रह्माचळाचा आघाडा। पहिलिया संकल्पजळाचा उभडा।**
**सवेचि महाभूतांचा बुडबुडा। साना आला।। ६९।।**

परमेश्वर श्रीहरी माऊली ज्ञानेश्वर महाराज सांगतात, जी मायानदी निर्गुण ब्रह्मरूपी पर्वताच्या तुटलेल्या कड्यात असतानाच प्रथम तिच्या ठिकाणी संकल्परूप जलाचा उगम होऊन पंचमहाभूतांचा लहानसा बुडबुडा आला.

ब्रह्माचळ हा शब्द निर्गुण ब्रह्माची मूळ स्थिती दर्शवितो. जे परब्रह्म निर्गुण-निश्चल-निराकार होते ते कसे होते किंवा आहे, हे शब्दांत सांगणे जवळ जवळ अशक्य आहे. तरीही थोडीफार तरी कल्पना यावी, म्हणून ब्रह्माचळ म्हणजे ब्रह्मरूप पर्वत हा शब्द वापरला आहे. आघाडा म्हणजे अर्ध्या तुटलेल्या कड्यातून. सामान्यत: नदीचे उगमस्थान हे पर्वतातील कड्यातून असते. मायानदीचा उगम झाला. परब्रह्म हा पर्वत, त्याच्या अर्ध्या तुटलेल्या उभ्या कड्यातून उगम पावलेली ही मायानदी होय. पर्यायाने ब्रह्म हेच मायेचे उगमस्थान होय.

आता हे घडले कसे? निश्चल, निराकार अथांग, निर्विकार, अक्षय, अजर, अमर, सर्वशक्तिमान व सर्वव्यापी अशा या ब्रह्माच्या ठिकाणी महदब्रह्म म्हणजे माया निर्माण झालीच कशी?

तर मूळ परब्रह्माला असणेपणाची जाणिव झाली. 'मी एक आहे, अनंत प्रकारचा होईन.' हा आदिसंकल्प ब्रह्माच्या असणेपणाच्या जाणिवेतून निर्माण झाला. असणेपणाची जाणीव झाल्याबरोबर बहुत प्रकारचा होण्याचा



संकल्प निर्माण झाला. येथेच महद्‌ब्रह्माची निर्मिती झाली. तेथेच बहुत प्रकारे होण्याचा संकल्प निर्माण झाला. हेच मायानदीचे उगमस्थानचे पाणी होय. उमाळा होय आणि तात्काळ त्यामध्ये पंचमहाभूतांचा 'बुडबुडा' निर्माण झाला. म्हणजेच पंचमहाभूते निर्माण झाली. तेथून पुढे अनावर असा सृष्टीच्या विस्ताराचा ओघ सुरू झाला.

सर्वव्यापी परमेश्वर हे जिचे उगमस्थान आहे, असणेपणा दर्शवण्याच्या ज्या आदिसंकल्पातून साकार, सगुण, सचेतन अथांग विश्व ज्या एकमेवाद्वितिय अशा प्रचंड शक्तीने निर्माण केले तिचेच नाव माया. जी अगणित रूपे प्रतिक्षण निर्मिते-नष्ट करते - पुन्हा निर्माण करते ती माया. चराचरात भरून राहिलेल्या निराकार परमेश्वराच्या स्वरूपावर सगुण साकार अशा सृष्टीरूपांचा खेळ जी आदिशक्ती करीत असते ती प्रचंड ईश्वरी शक्ती म्हणजे माया. तिलाच नदीची उपमा देऊन श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या अलौकिक सामर्थ्याने तिचे वर्णन केले आहे. ही त्रिगुणात्मक माया अतिदिव्य भव्य असून तिचा निरास स्वसामर्थ्यावर करणे, जिवांना शक्य नाही.

**जे सृष्टीविस्ताराचेनि वोवे।**
**चढत काळकळनेचेनि वेगे।**
**प्रवृत्ती निवृत्तीची तुंगे। तटे सांडी।। ७०।।**

जी सृष्टीच्या विस्ताररूपी योगाने, काळगतीच्या वेगाने वाढून, प्रवृत्ती आणि निवृत्तीचा उंच काठ ओलांडून जिचा प्रवाह पुढे चालला आहे.

ब्रह्माचळाच्या तुटलेल्या कड्यातून उगम पावलेली ही मायानदी सृष्टीविस्ताराच्या ओघाने अतिशय वेगाने चालली आहे. तिचा वेग किती असावा? श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ती काळाच्या वेगाने चालली आहे, असे म्हटले आहे. सर्वात वेगवान काय असेल, तर तो काळ होय. कारण तो कधी थांबत नाही. विश्रांती घेत नाही. त्याची गती कधीही कमी-जास्त होत नाही. त्याला कोणी रोखू शकत नाही. मागे वळवू शकत नाही.

पुढेही ढकलू शकत नाही. कारण त्याच्यासारखा वेगवान तोच. काळाची गती हीच मायेची गती होय. ब्रह्मांडांची उत्पत्ती व संहार ती कोणत्या गतीने करीत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

आता एवढ्या कल्पनातीत गतीने जी मायानदी धावत असेल, तिच्या काठांची वा तटांची काय अवस्था होत असेल? कर्म हा एक तट तर दुसरा तट मोक्ष होय. हे दोन्ही तट अतिशय उत्तुंग आहेत, यात संशय नाही. म्हणजे कर्ममार्ग आणि मोक्षमार्ग यांना ओलांडून ही मायानदी पुढे धावते.

**जे गुणघनाचेनि वृष्टीभरे। भरली मोहाचेनि महापुरे।**
**घेऊनि जात नगरे। यमनियमांची।।७१।।**

जी गुणरूपी मेघांच्या पावसाच्या पाण्याने तुडूंब भरलेली आहे. तिला मोहाचा महापूर आला असून त्या भ्रमाच्या महापुरात यम आणि नियमांची शहरेच्या शहरे वाहून जात आहे.

सत्व, रज आणि तम या त्रिगुणांनी युक्त अशीच ही दिव्य माया आहे. त्यामुळे या त्रिगुणांचे वर्चस्व सकळ सृष्टीवर राहणार हे उघडच आहे. हे त्रिगुण आपापले प्राबल्य वेळोवेळी त्रिलोकांवर टाकत असता, त्यावेळी व्यक्तीने केलेले यम आणि नियम जमीनदोस्त होतात. आपण हे पाहतो. अंतरी अनुभवतो देखील.

गुणांच्या वृष्टीचा महापूर म्हणजे पहा. सात्विक भक्ताला वाटते की, मी सात्विक आहे. ज्ञानी आहे. विद्वान आहे. रजोगुण कर्म आणि उपभोगाला सतत वाढवीत असल्याने 'मी हे केले, पुढे हे करीन, ते करीन,' 'हे मिळवीन, ते मिळवीन' वगैरे कधीही तृप्त न होणे हे रजोगुणाचे वैशिष्ट्य होय. हावरूपी भ्रांती वाढतच राहते. तर तमोगुणाबद्दल काय बोलावे? कसलाही विधिनिषेध न राखता केवळ भोगलोलुपता हेच त्याचे सारसर्वस्व असते. अपराध करीन पण भोग भोगीन हीच प्रवृत्ती तमोगुणांच्या ठायी असते.



मायानदीच्या रूपकाने माऊली ज्ञानेश्वर महाराज मायेचे नितांतसुंदर वर्णन करीत आहेत. या प्रपंचरचनेत आणखी काय काय आहे, याचे वर्णन ते पुढे करीत आहेत –

**जे द्वेषाच्या आवर्ती दाटत। मत्सराचे वळसे पडत।**
**माजी प्रमादादि तळपत। महामीन।। ७२।।**

जी मायानदी द्वेषरूपी भोवऱ्याने दाट भरून गेली आहे. हिची वळणे मत्सराची आहेत. जिच्यामध्ये अपराध-उन्मत्तपणा इत्यादि दोषांचे मोठमोठे मासे तळपत आहेत.

त्रिगुणात्मक अशा या दिव्य दैवी मायेमध्ये द्वेष, मत्सर, उन्मत्तपणा सहजताच अथांग आहे. भक्तहो पहा, दुर्योधनाचेच एक उदाहरण घ्या. ज्याने पांडवांचा अखंड द्वेष केला. तो द्वेष घनदाट होता. पांडवद्वेषाच्या भोवऱ्यात गरगरतेला दुर्योधन हस्तिनापूरचा युवराज होऊन देखील त्या भोवऱ्यातून बाहेर पडू शकला नाही. ओसाड भूमीत अमरावती सारखं इंद्रप्रस्थ पाहून त्याच्या द्वेषाच्या भोवऱ्यांने मत्सराचे वळण घेतले.

दुर्योधनाच्या साथीस असलेल्या त्याच्या गुणांच्या – जिवाभावाच्या सख्याने – म्हणजे शकुनीमामाने डाव टाकून, कपटद्यूत खेळून इंद्रप्रस्थासह पांडवांचे सारे राज्य, पांडवांसह द्रौपदी यांना जिंकले. पुढे दु:शासनाने उन्मत्तपणाने द्रौपदीला केस धरून ओढत सभेत आणले. भरसभेत तिला नग्न करण्याचा महाप्रमाद करण्यापर्यंत त्या पाप्यांची मजल गेली. प्रत्यक्ष परमेश्वर भगवान श्रीहरी द्रौपदीचे पाठीराखे असल्यामुळे त्या उन्मत्त महामीनांचे मनसुबे उधळले गेले.

तर भक्तहो, हे झाले प्रातिनिधीक उदाहरण, अशी अगणित उदाहरणे वैयक्तिक व सामाजिक जीवनात घडली आहेत, घडत आहेत आणि घडत राहतीलही. कारण, द्वेष-मत्सर-प्रमाद-मोह आदि सर्व मूळ मायेतच अंतर्भूत आहेत. हे आपल्या नित्य अनुभवास येत असते.

या मायानदीचे म्हणजेच मायेचे वर्णन करीत असताना श्री ज्ञानेश्वर महाराज पुढे म्हणतात –

**जेथ प्रपंचाची वळणे। कर्माकर्माची वोभाणे।**
**वरी तर्ताती वोसाणे। सुखदु:खाची।।७३।।**

ज्या मायानदीमध्ये प्रपंचरूपी भेदाची अनेक वळणे असून कर्म आणि अकर्माच्या भेदामध्ये सुखदु:खरूपी केरकचरा वर तरंगत आहे.

या अनुपम अशा मायानदीत प्रपंचाची वळणे आहेत आणि प्रपंच म्हटले की कर्म आणि अकर्म यांचे पूर अनेक वळणाने वाहणार हे उघडच आहे. कर्म आणि अकर्म यापासून सुखदु:ख उत्पन्न होणारच. श्री माऊलींनी 'वोसाणे' म्हणजे केरकचरा हा एकच शब्द सुख आणि दु:खासाठी वापरला आहे. मायानदीतील सुखदु:खांना एकाच शब्दाने संबोधून माऊलींनी त्यांची बोळवण का बरे केली असावी? त्याचे कारण म्हणजे मायानिर्मित सुख–दु:खे ही भावनेच्या पातळीवर देहाच्या साह्याने प्रपंचात अनुभवता येतात. ती फसवी असतात. क्षणभंगूर असतात.

**रतीचिय बेटा। आदळती कामाचिया लाटा**
**जेथ जीवफेन संघटा। सैंघ दिसे।। ७४।।**

जिच्या प्रवाहामध्ये विषयसुखरूपी बेटावर कामविकाराच्या लाटा जोराने आदळून त्या ठिकाणी जीवरूप फेसाचा समुदाय दाटलेला दिसतो.

या ठिकाणी विषयसुखांचे बेट किती प्रचंड असावे? विषयसुखांचा उपभोग घेण्याच्या उर्मीसुद्धा किती वेगवान आणि शक्तिमान असाव्यात? विषयसुखरूपी बेट प्रचंड व भक्कम. त्यावर सातत्याने आदळणाऱ्या कामाच्या लाटा या अनिवार व सातत्याच्या परिणामत: जिवांचे समुदायच्या समुदाय तितक्याच प्रचंड प्रमाणात निर्माण होतात. या जीवसमुदायांना माऊलींनी 'जीवफेन' असा शब्द वापरला आहे. फेन म्हणजे फेस. जो फेस निर्माण होतो. अल्पकाळ टिकतो विरून जातो – पुन्हा निर्माण होतो.



ही क्रिया अखंड चालूच राहते. जिवांची साकार होण्याची, नष्ट होण्याची, पुन्हा निर्माण होण्याची, क्रिया ही अशाश्वत अशा फेसाप्रमाणे आहे. कामवासनेच्या उर्मीतूनच नवनवे जीव जन्मास येतात. अत्यल्प काळ जगतात, मरून जातात. हेच माऊलींनी येथे सूचीत केले आहेत.

**अहंकाराचिया चळिया। वरी मदत्रयाचिया उकळिया।**
**जेथ विषयोर्मींच्या आकळिया। उल्लाळ घेती।। ७५।।**

ज्या मायानदीमध्ये अहंकाराच्या चिळकांड्या उडत असतात. त्यावर विद्या–धन–सामर्थ्य किंवा संपत्ती, तारूण्य आणि कूळ असा तीन मदांच्या उकळ्या येतात आणि ज्या नदीमध्ये विषयरूपी लाटांवर लाटा उसळी घेत असतात.

अहंकाराचा ओघ जेवढा प्रचंड असतो तेवढा तो कशाचाच नसतो,असे म्हटले तर वावगे ठरू नये. कारण प्रत्येक लोंढा उत्पन्न होतो व ओसरतो. परंतु अहंकाराचा जो प्रवाह उत्पन्न झाला आहे, तो जिवाचा आकार संपला तरी नाहीसा होत नाही. किंबहुना त्याचा पुढील आकार हा त्याच्या अहंमुळेच प्राप्त होतो. त्या अहंकाराच्या ज्या चिळकांड्या उडत असतात त्यावर तीन प्रकारच्या गर्वाच्या उकळ्या फुटत असतात. 'मी विद्वान आहे', 'मी धनवान आहे', 'मी सामर्थ्यवान आहे' असे मदत्रय असते किंवा संपत्ती–कूळ आणि तारुण्य असे म्हटले तरी चालेल. तारूण्याचा मद तर सर्वांत अधिक भयंकर असतो.

धन हेच सारसर्वस्व मानले जाण्याच्या आजच्या काळात धनवानांच्या गर्वास सीमाच राहत नाही. 'धन माझ्या घरात सर्व सुखे सभोवारात' इथपर्यंत धनमदाची उकळी जाते. न्याय–निती–समता–प्रतिष्ठा–सत्ता आणि सर्व सुखांचा उपभोग हा मी धनाच्या जोरावर मिळवू शकतो, अशी धनमदाची समजूत होते.

सामर्थ्याच्या मदाची गोष्ट काय सांगावी? तो तितकाच सामर्थ्यवान असतो. शक्तिमदाने दुसऱ्यांना पायावर झुकविण्यापासून ते मोठमोठी

राज्ये जिंकून मांडलिक करण्यापर्यंतची अनेक उदाहरणे, भक्तहो आपणास ज्ञात आहेतच.

शक्तिशाली भिमाला आपल्या शक्तीचा तर धनुर्धारी वीर पार्थाला आपल्या अचाट धनुर्विद्येचा गर्व झाला होता. स्वत: भगवंतांच्या युक्तिने तो नाहीसा झाला हे सर्वज्ञात आहे.

**उदयास्ताचे लोंढे। पाडीत जन्ममरणांचे चोंढे।**
**जेथे पांचभौतिक बुडबुडे। होती जाती।। ७६।।**

ज्या मायानदीत उदय अस्ताचे लोंढेच्या लोंढे जन्ममृत्युरूपी दगड पाडतात आणि जेथे पांच महाभूतांपासून निर्माण झालेले शरीररूपी बुडबुडे निर्माण होतात आणि नाहीसे होतात.

सृष्टीचा उदय आणि अस्त ही प्रक्रिया अखंड चालूच राहते, हे व्यापक अर्थाने मायेचे सामर्थ्य होय. तर जिवांच्या दृष्टीनेही तितकेच योग्य असे हे कथन आहे. मायेतच जन्ममृत्यु आहेत. जन्म म्हणजे उदय व अस्त म्हणजे मृत्युरूपी लोंढे अस्त म्हणजेच जन्ममरणाचे धोंडे या मायानदीत कोसळवित असतात. हेच दुसऱ्या शब्दात माऊलींनी सांगितले आहे की पंचमहाभूतात्मक शरीरे होत-जात असतात. त्यांना 'बुडबुडे' हा शब्द वापरून जिवांचे होणे जाणे हे किती नगण्य आहे, हे येथे स्पष्ट होते. जन्माचा धोंडा वरून मायानदीत पडला की, तो तळाला जातो न जातो तोच मृत्युचा बुडबुडा वर येतो. इतका अल्पकाळ जिवांचे आकार येथे टिकतात म्हणून 'बुडबुडे' या शब्दातून क्षणभंगुरत्व प्रगट केले आहे. मायेची प्रचंड व्याप्ती पाहता ते अगदी सार्थ आहे.

**संमोह विभ्रम मासे। गिळिताति धैर्याची आमिषे।**
**तेथ देव्हडे भोवत वळसे। अज्ञानाचे।। ७७।।**

जिच्यामध्ये मोह आणि भ्रांति रूपी मासे सात्विक धैर्यरूपी आमिषाला गिळून टाकतात आणि ज्या नदीत अज्ञानाचे मोठे भोवरे वाकडे तिकडे फिरत असतात.



या दिव्य मायेमध्ये मोह अनिवार आहे. कुणाला धनसंपत्तीचा तर कुणाला विषयोपभोगाचा तर कुणाला गुणानुरूप किर्तीचा मोह. मोह कशाचाही असो, तो वाईटच. प्रापंचिक उपभोगाचा मोह टाळून धैर्याने जर कोणी तो जिंकण्याचा प्रयत्न केला तर तो विफल होतो. जे मूलत: जसे असते, त्याच्या नेमके उलटे दिसते-भासते. म्हणूनच तर जीव मायानदीत गटंगळ्या खात राहतात. याबाबतीत हिमनगाचे उदाहरण देता येईल. दक्षिण ध्रुवाजवळ समुद्रात प्रचंड आकाराचे हिमनग असतात. पण त्याचा आठवा भाग पाण्यावर दिसतो. त्यावरून जर तो छोटा आहे, अशी कल्पना करून जहाज चालकाने त्याच्या जवळून बिनधास्तपणे जहाज चालवण्याचा प्रयत्न केला तर हिमनगाच्या पाण्याखालील भागावर ते आपटून फुटण्याचा धोका असतो. अगदी तसेच या मायेमध्ये असते. अमूक एका उपभोग्य वस्तूपाठी सुखलालसेने जीव धाव घेतो. त्यातून त्याला सुख फारच थोडे आणि दु:ख मात्र प्रचंड प्राप्त होत असते. आपण जे आहोत तेच सत्य आहोत (देहरूपी) अशी ठाम अज्ञानमय भ्रांती जिवास असते. या भ्रमामुळेही जीव प्रपंचात वेगवेगळे वळसे घेत गरगरत असतात.

**भ्रांतीचेनि खडुळे। रेवले आस्थेचेनि अवगाळे।**
**रजोगुणाचेनि खळाळे। स्वर्ग गाजे।। ७८।।**

ज्या मायानदीमध्ये भ्रांतीचे गढूळ पाणी आहे आणि आशारूपी गाळामध्ये प्राणीमात्र रुतले आहेत. रजोगुणाच्या खळखळाटाने स्वर्गदिखील गर्जू लागला आहे.

जिवात्मा जेव्हा देहरूपाने प्रगटतो तेव्हाच त्रिगुण त्यात समाविष्ट असतात. त्यापैकी रजोगुण हा प्रीतीस्वरूप आहे. तो आशा आणि आसक्ती यांच्या संबंधाने उत्पन्न झाला आहे. या गुणांपासून नेहमी जिवाचे रंजन होते. काम्य कर्मे करून सुखोपभोगासाठी साधने निर्माण करून त्यांचा भोग घेणे, हाच या गुणाचा गुणधर्म होय. ज्या कर्मापासून उपभोगाचे

काही मिळणार नाही, असे कोणतेही कर्म रजोगुणी करणार नाही. ज्या कर्मापासून ते मिळणार आहे, त्यासाठी काहीही करण्याची त्याची तयारी असते. यज्ञदाने वगैरे करून स्वर्गप्राप्तीची इच्छा धरतो. ज्या मायेमध्ये भ्रांतीचे गढूळ पाणी आहे, त्या मायानदीत कमालीच्या गढूळपणामुळे तळाचे स्पष्टपणे दिसणे अशक्य असते. खाली गाळच असतो, पण त्यातच सुखांचा रत्नखजिना आहे, अशी आशा धरून जिव त्याच गाळात रुतलेले असतात. निव्वळ उपभोग आणि उपभोग हेच ज्या स्वर्गाचे वैशिष्ट्य असते, त्यासच अगदी सार्थपणे, रजोगुणाच्या खळखळाटाने स्वर्ग गाजतो, असे श्री ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे. त्याच स्वर्गप्राप्तीकडे जिवात्म्याची ओढ असणे हेही येथे अभिप्रेत आहे.

**तमाचे धारसे वाड। सत्त्वाचे स्थिरपण जाड।**
**किंबहुना हे दुवाड। मायानदी।। ७९।।**

तमोगुणाचा प्रवाह प्रचंड आहे. सत्वगुणाचा जाड स्थिरपणा आहे. किंबहुना ही मायानदी तरुन जाण्यास अतिशय कठीण आहे.

त्रिगुणात्मक मायेमधील तमोगुण हा अत्यंत प्रबळ, हीनकस आणि वाईट आहे. तो देहधारी जिवात्म्यास उत्तरोत्तर अधोगतीस नेण्याचे काम करीत असतो. सद्‌गतीस नेणाऱ्या सत्वगुणाचे स्थिरपणा व जाडी ही सुद्धा अतिशय प्रबळ असते. या सत्वगुणाच्या कचाट्यातून सुटणेसुद्धा सोपे नाही. आपण म्हणाल की सत्वगुण चांगला आहे. दुर्मिळही आहे. अगदी बरोबर. नव्हे त्याची जोपासना करणे हेसुद्धा अत्यंत गरजेचे आहे. परंतु निर्दोष आणि प्रकाशक असा हा सत्वगुण तो निर्मल असल्याने सुखसंबंधाने आणि ज्ञानसंबंधाने जिवात्म्यास बांधून टाकतो. (गीता - अ१४/६) आणि याच कारणासाठी माऊलींनी येथे 'सत्वाचे स्थिरपण जाड' असे म्हटले आहे. त्याचा डोह मोठा आहे, पण तोही पार करायला हवा आहे. सत्व-रज-तम या त्रिपुटींसह आत्तापर्यंत केलेल्या मायानदीतील बाबींच्या उल्लेखाच्या संदर्भासह माऊलींनी 'किंबहना दुवाड' असा या मायानदीचा उल्लेख केला आहे.



**पै पुनरावृत्तीचेनि उभडे। झळंबती सत्यलोकीचे हुडे।**
**घाये गडबडती धोंडे। ब्रह्मगोळकाचे।। ८०।।**

या मायानदीच्या जन्ममृत्युंच्या पुराच्या लोंढ्यात सत्यलोकीचे किल्ले वाहून जातात आणि ब्रह्मांडगोलाचे धोंडे खाली गडगडत येतात.

भूलोक, भुवर्लोक, स्वर्गलोक इ. लोकांतील सर्वांना म्हणजे सत्यलोकापासून मृत्युलोकापर्यंत सर्वांना पुनरावृत्तीच्या फेऱ्यातून सतत जावे लागते. म्हणजेच जन्मणे-भोगणे-मरणे पुन्हा जन्मणे यातून कोणीही सुटत नाही. पुण्यात्मक पापाने स्वर्गी गेलेले मातब्बर पुण्यवंत त्यांच्या पुण्याची शिदोरी संपली की पुन्हा मृत्युलोकी जन्मतात. 'हुडे' म्हणजेच मातब्बर पुण्यवंत होय. एवढेच नव्हे तर अनंत ब्रह्मांडांची घडामोडही सतत होत असते. इतका प्रचंड-व्यापक अर्थ येथे आहे. उत्पत्ती-स्थिती-लय हे वैज्ञानिक सत्य आहे. चेतन आणि अचेतन पदार्थांना ते सारखेच लागू आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांची दिव्यदृष्टी किती प्रचंड आणि सखोल आहे, याचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

**तया पाणियाचेनि वहिलेपणे। अझुनी न धरिती वोभाणे।**
**ऐसा मायापूर हा कवणे। तरिजेल गा?।।८१।।**

या मायानदीच्या महापुरात अजूनही कोणाला पाय रोवून उभे राहता आले नाही, असा हा मायेचा महापूर पोहून कोण बरे पार जाईल?

माया अतिशय सामर्थ्यशाली असल्यामुळे तिचा निरास करणे अजूनही कोणास शक्य झाले नाही. म्हणजे स्वसामर्थ्यावर शक्य झाले नाही, असे येथे माऊलींना म्हणायचे आहे.

**एथ एक नवलावो। जो जो कीजे तरणोपावो।**
**तो तो अपावो। होय ते ऐक।। ८२।।**

आणखी एक आश्चर्य असे आहे की, या माया नदीतून पोहून पैलतिरास जाण्याचा जो जो उपाय तो तो अपाय होतो. कसे ते ऐक.

स्वत: माऊलींनीच आश्चर्य व्यक्त करीत एक अतिशय विचित्र बाब येथे निदर्शनास आणली आहे, ती म्हणजे ही नदी तरून जाण्याचे जे जे उपाय करावेत ते ते अपाय ठरतात ही होय. यावरून ही माया किती किती दुस्तर असेल याची कल्पनाच केलेली बरी.

भक्तहो, येथेपर्यंत 'हे माझी माया' या तीन शब्दांवरील विवेचन म्हणजे मायेचे स्वरूप- याचे विवेचन आपण विस्ताराने ऐकलेत.

आता यापुढे आपण, मायानदी तरुन जाण्यासाठी जिवात्म्याकडून जे जे उपाय करावेत. ते ते कसे अपाय होतात, हे जे ज्ञानेश्वर महाराज सांगत आहेत, ते पाहू. श्री माऊली म्हणतात :-

**एक स्वयंबुद्धीच्या बाही। रिगाले तयांची शुद्धिचि नाही।**
**एक जाणिवेचि डोही। गर्वेचि गिळिले।। ८३।।**

कोणी आपल्या स्वबुद्धीच्या बळावर मायानदी तरून जाण्यासाठी तीमध्ये उडी घेतली, परंतु ते पुढे कुठे गेले, याचा काही पत्ता लागला नाही. काहीजण जाणून घेण्याच्या डोहामध्ये शिरले म्हणजे त्यांनी पांडित्यपूर्ण ज्ञान मिळवले पण त्याच ज्ञानाच्या गर्वाच्या आहारी गेले.

पहा महाराज, बुद्धीच्या पलिकडे असणाऱ्या परमात्म्यापर्यंत पोहचण्याचे स्वबुद्धीच्या साहाय्यानेच प्रयत्न करण्याचा उपाय हे कसे अपाय ठरतो ते! परमात्म्यापर्यंत पोहचण्याचे सामर्थ्य आपल्या बुद्धीत आहे. तिच्या सहाय्याने आपण उपाय करून त्याचे पर्यंत पोहचू ही घमेंडच जो असा उपाय करतो, त्याचा थांगपता न लागण्यास कारण ठरतो. कारण विलक्षण मायाप्रभावाने एका विशिष्ट क्षणी बुद्धी भ्रमीत होत असते आणि असा बुद्धी भ्रमित पुन्हा भलतीकडेच निघून जात असतो.

दुसरे कोणी पांडित्यपूर्ण ज्ञानाची सिद्धी प्राप्त करतात. परमात्मा कसा आहे, कुठे आहे, कसे जायचे इ. प्रचंड माहिती ते मिळवतात. त्यांना परमात्म्याची जाणिवही होते. त्या क्षणीच त्यांना 'अहं ज्ञातृत्वाच्या अहंगंडाची बाधा होते आणि असा गर्व एकदा झाला की झालेल्या



जाणिवेत विरून जाण्याऐवजी गर्वाने गिळले जातात. विद्वत्तेतच अधिकाधिक गुरफटतात.

**एकी वेदत्रयाचिया सांगडी। घेतल्या अहंभावाचिया धोंडी।**
**ते मदमीनाच्या तोंडी। सगळेचि गेले।। ८४।।**

मायानदी तरुन जाण्यासाठी कित्येकांनी तीन वेदांच्या सांगडी बरोबर घेतल्या पण विद्येच्या अहंभावाचे धोंडे बरोबर घेतल्यामुळे ते मदरूपी माशाच्या तोंडात सगळेच नाहीसे झाले.

भक्तहो, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या वेदांतीत ज्ञानाचा किस पाडून, त्यानुसार वर्तन करून ही माया पार करण्याचा ज्यांनी प्रयत्न केला, वेदांचे ज्ञान अमोल असल्याने त्यांना त्या ज्ञानाचा गर्व झाला आणि गर्वरूपी माशांने त्यांना गिळंकृत केले. आम्ही वेदज्ञ, आम्ही त्रिवेदी - चतुर्वेदी असा अहंगंड उत्पन्न होतो. वेदातील ज्ञानाच्या जोरावरच आम्ही परमात्मा प्राप्त करू शकतो अशी भावना त्यांच्या नकळतच त्यांच्यात उत्पन्न होते. या गर्वामुळे ते परमात्म्यापर्यंत पोहचू शकत नाहीत.

**एकी वयसेचे जाड बांधले। मग मन्मथाचिये कासे लागले।**
**ते विषयमगरी सांडिले। चघळुनिया।। ८५।।**

कित्येकाने तारुण्याची घट्ट अशी कंबर बांधली आणि ते मदनाच्या कासेला लागले. त्यांना विषयरूपी मगरींनी चघळून टाकले.

कोणी ऐन तारुण्यात जोपर्यंत सर्व इंद्रियांची क्षमता अत्युत्कष्ट असते, तो विविध अध्यात्मिक मार्गांनी मायेचा निरास करण्याचा प्रयत्न करतो. परंतु तो कधी ना कधी बेसावधक्षणी विषयसुखाच्या मगरमिठीत बद्ध होतो. मग तेच परमसुख मानतो. विषयोपभोग जेवढा घ्यावा तेवढा वाढतच जातो. कुठपर्यंत? तर विषयरूप मगरीने चघळून त्याचे चिपाड होईपर्यंत. म्हणजे कामोपभोगांची इंद्रियांची क्षमता संपेपर्यंत वृद्धत्व येईपर्यंत! असे का व्हावे? तरुण साधक विषयरूप जाळ्यात का आडकावा? त्याचे कारण म्हणजे आध्यात्मिक साधनांनी शारीरिक क्षमता कमालीच्या वाढतात,

त्याबरोबर विषयोपभोगाची क्षमताही वाढते. यावर नियंत्रण ठेवणे अशक्य होते आणि विषयाच्या मगरीमठीत तो स्वत:हून जातो.

**आता वार्धक्याच्या तरंगा । माजी मतिभ्रंशाचा जरंगा।**
**तेणे कवळिजताती पै गा। चहूकडे।। ८६।।**

मग ते वार्धक्याच्या हेलकाव्यात बुद्धीभ्रमरूपी जाळ्यात सापडतात. त्यायोगे चारी बाजूनी गुरफटून जातात.

मग विषयोपभोगरूपी मगरीने चघळल्यावर सर्व शारीरिक क्षमता कमी झाल्याने आपोआपच बुद्धीही भ्रमित होते. बुद्धीभ्रष्टतेचे जाळे इतके प्रचंड असते की, तो चहूकडून वेढला जातो. कामोपभोगातून निर्माण झालेल्या अनेक बाबी त्याला त्रस्त करतात. मग पुढे -

**आणि शोकाचा कडा उपडत। क्रोधाच्या आवर्ती दाटत।**
**आपदागिधी चुंबिजत। उधवला ठायी।। ८७।।**

आणि पुढे ते शोकरूपी कड्यावर आदळतात. क्रोधरूपी वादळात सापडतात. ते डोके वर काढू लागले की संकटरूपी गिधाडे त्यास टोचून खाऊ लागतात.

कामोपभोगाच्या मगरमिठीत शिरल्यावर चघळून चिपाड होईपर्यंत त्यातून तो बाहेर पडू शकत नाही आणि चिपाड झाल्यावर जेव्हा त्याला नागवले गेल्याची जाणीव होते तेव्हा त्यास अतोनात दु:ख होते. कामोपभागातून वार्धक्य-शारीरिक क्षमता कमकुवत - त्यातून निर्माण झालेल्या सांसारिक बाबी, त्यातून होणारे दु:ख, येणारा राग, सततची संकटे यातून उसळणारा क्रोधाग्नी या सर्वातून तो डोके वर काढूच शकत नाही. कारण जरी त्याने डोके वर काढले तर संकटांची गिधाडे त्याला टोचून खायला सुरुवात करतात.

संतसज्जनहो, मायानदीत जिवाची दैना काय होते. केवळ साधकांची नव्हे तर जवळ जवळ सर्व अस्तिक जनांची अवस्था अशीच होते.



**मग दु:खाचेनि बरटे बोबले। पाठी मरणाचिये रेवे रेवले।**
**ऐसे कामाचे कासे लागले। ते गेले वाया।।८८।।**

मग ते दु:खाच्या चिखलाने बरबटले जातात. नंतर मृत्युच्या गाळात रुततात. याप्रमाणे ज्यांनी कामाचा आश्रय घेतला ते वाया जातात.

भक्तहो, हे सारे आपल्या पाहण्यातील आहे. थोड्याफार फरकाने प्रत्येक संसारी जिवाची दशा अवस्था अशीच होते. तारुण्यसुलभ वासनेतून संसार साकार होतो. त्याचा विस्तार होतो. विस्ताराने तो वेढला जातो. सगळा पिळून निघेपर्यंत तो शुद्धीवर येत नाही. जेव्हा तो येतो त्यावेळी वार्धक्याचे आक्रमण झालेले असते. बुद्धीची क्षमता कमी होते. म्हणतातच ना 'साठी आणि बुद्धी नाठी!' या सर्वश्रुत वचनानुसार बुद्धीभ्रंशाचे जाळे तो पुन्हा तोडू शकत नाही. स्वत: केलेल्या विस्ताराच्या गाळात बरबटून रुतून दु:खाने माखलेल्या अवस्थेतूच त्याचा मृत्यू होतो. म्हणजेच, मायानदी तरुन जाण्यास तो असमर्थ ठरतो.

**एकी यजनक्रियेची पेटी। बांधुनी घातली पोटी।**
**ते स्वर्गसुखाच्या कपाटी। शिरकुनी ठेले।। ८९।।**

कित्येकांनी मायानदी तरून जाण्यासाठी यज्ञक्रियारूपी पेटी आपल्या पोटाशी बांधली, ते स्वर्गसुखाच्या कपारीत शिरून तेथेच अडकून राहिले.

कर्मफलावर डोळा ठेवून जे लोक काम्य पुण्य कर्मे करतात त्यांना स्वर्गसुखाची प्राप्ती होतेच होते पण यज्ञकर्मे करून मायानदी पार करून परमेश्वरापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनासुद्धा स्वर्गसुखे भुरळ घालून आपल्या कपारीत ठेवून घेतात. हाही उपाय वाया जातो.

**एकी मोक्षी लागावयाचिया आशा। केला कर्मबाह्यांचा भरंवसा।**
**परि ते पडिले वळसा। विधिनिषेधांच्या।।९०।।**

कोणी मोक्षरूपी पलिकडच्या किनाऱ्यावर लागावे या आशेने कर्मरूप बाहूवर विश्वास ठेवला, परंतु ते विधीनिषेधांच्या वळणात सापडले गेले.

कोणते कर्म योग्य? कोणते अयोग्य? करीत असलेल्या कर्मात जर वेगळा अनुभव आला तर ते आपले चुकले का? अपयश आले तर कर्मातील कोणत्या चुकीमुळे? मग बरोबर काय? इत्यादि विधीनिषेधांच्या भोवऱ्यात आडकतात. कर्तव्याकर्तव्याच्या गुंत्यात सापडतात आणि मायानदी पार करू शकत नाहीत. श्री. ज्ञानेश्वर महाराज पुढे म्हणतात,

**जेथं वैराग्याची नाव न रिगे। विवेकाचा तागा न लगे।**
**वरी काही तरो ये योगे। तरी विपाये तो।।९१।।**

या मायानदीत वैराग्याची नाव चालत नाही आणि विवेकरूपी वेळू जमिनीला टेकत नाही. तरीसुद्धा अष्टांग योगाच्या आधारे तरुन जाण्याची शक्यता असते. परंतु तसा साधक एखादाच असतो.

भक्तहो, कोणी एखादा संसारत्याग करून वैराग्य स्विकारतो. तर कुणाला दु:खातिशयाने वैराग्य येते. कोणी संसारदु:खाने वैतागून संसार सोडून देऊन मायापार करण्यासाठी वैराग्याची कास धरतो. परंतु ही मायानदी इतकी विलक्षण आहे की, अशी वैराग्याची नाव तिच्यात टिकत नाही. वेषाने बैरागी आणि मनाने संसारी अशी त्यांची अवस्था होते. बैराग्याच्या मनात संसाराचे प्रेम उत्पन्न होते आणि त्याचे वैराग्य धुळीस मिळते. तो संसारात परत येतो.

आणि खऱ्याखुऱ्या वैराग्याची प्राप्ती ज्यास झाली आहे, त्याचे तेही वैराग्य देहपातापर्यंत टिकेल याची शाश्वती नसते. म्हणूनच श्रीहरी ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, वैराग्याची नाव सुद्धा या नदीत टिकत नाही.

विचारशक्ती ही मानवाला लाभलेली फार मोठी देणगी आहे. त्या विवेकशक्तीर परमेश्वरप्राप्तीची शक्यता वाटते, पण केवळ अनुमान आणि केवळ विवेकशक्तीने निश्चित केलेले परमेश्वराचे स्वरूप माया पार करण्यास पुरेसे पडत नाही. विवेकाची नितांत गरज आहे, हे खरे आहे, पण तेवढ्यावरच भागत नाही. कारण विवेकाचे जन्मस्थान मानवी मेंदू आहे. त्याच्या कार्यकक्षेला मर्यादा आहेत.

ध्यानयोग/आत्मसंयमनयोगाच्या साधनेने मात्र मायानदी पार करता



येते. योगसामर्थ्यांने माया पार करण्याची उदाहरणे मात्र अपवाद म्हणूनच घडू शकतात. त्याची कारणे अनेक आहेत. योगाभ्यास तसा जिवांना कठीण आहे. त्या मार्गास जाणारे अगदी थोडे असतात. जातात त्यांना प्राप्त होणाऱ्या सिद्धींचा मोह पडतो. त्यात गुरफटतो. योगमार्गापासून भ्रष्ट होतो. अनेक जन्मात योगसिद्धीची प्रगती होत राहते. ती किती जन्म चालू राहील याची काही निश्चिती नसते. म्हणून योगाच्या सामर्थ्यावर माया पार केल्याची उदाहरणे दुर्मिळ आहेत. तरीही योगाभ्यास कधीही वाया जात नाही, हे सत्य आहे.

भक्तहो, आतापर्यंत आपण मायानदी तरून जाणाऱ्या मुमुक्षु जिवात्म्यांचे उपाय आणि त्यांचे अपायात होणारे रूपांतर पाहिले. त्यापुढे आता परमेश्वर सांगतात की जर अशक्य गोष्टी घडतील तर स्वसामर्थ्यावर जीव माया तरतील.

**ऐसे तरी जीवाचिये अंगवणे। इये मायानदीचे तरणे।**
**हे कासयासारिखे बोलणे। म्हणावे पा?।।९२।।**
**जरी अपथ्यशिला व्याधी। कळे साधुसी दुर्जनाची बुद्धी।**
**की रागी सांडी सिद्धी। आली सांती।। ९३।।**
**जरी चोरा सभा दाटे। अथवा मीना गळू घोटे।**
**ना तरी भेडा उलटे। विवसी जरी।।९४।।**
**पाडस वागूर करांडी। का मुंगी मेरू ओलांडी।**
**तरी मायेची पैलथडी। देखती जीव।।९५।।**
**म्हणवुनी गा पंडूसुता। जैसी सकामा न जिणवेचि वनिता।**
**तैसी मायामय हे सरिता। न तरवे जिवा।।९६।।**

याप्रमाणे स्वत:च्या अंगच्या सामर्थ्याने ही मायानदी तरून जाणे कशासारखे आहे म्हणावे बरे? जर पथ्य न पाळणाऱ्याला रोग घालविता येईल किंवा साधूला दुर्जनांची बुद्धी कळू शकेल अथवा एखाद्या लोभ्याला सिद्धी प्राप्त झाली असता तो तिला सोडेल. जरी चोरांची सभा भरेल अथवा माशाला गळ गिळता येईल किंवा भित्र्या माणसाला पिशाच्चावर

हल्ला करता येईल, जर हरणाचे पाडस जाळे कुरतडून टाकेल किंवा मुंगी मेरू पर्वत ओलांडून जाईल, तर मायानदीपलीकडील काठ जीव पाहू शकेल. म्हणून हे पंडुसुता, ज्याप्रमाणे विषयासक्त पुरुषास स्त्री जिंकता येत नाही, त्याप्रमाणे ही मायारूपी नदी जीवाला तरता येत नाही.

भक्तहो, एखाद्या रुग्णाच्या रोगावर डॉक्टर औषधोपचार करीत आहेत. त्या रुग्णास त्यांनी काही पथ्ये सांगितली आहेत. त्याने जर ती पाळली नाहीत तर त्या रुग्णाचा रोग बरा होणार नाही. औषधोपचार व्यर्थ जाणार. दुर्जन माणसाच्या बुद्धीत काय चालले आहे त्याचे सज्जनास आकलन होत नाही. म्हणून तर साधूकडून काही विशिष्ट ज्ञान प्राप्त करून दुर्जन लोक त्याचा दुरूपयोग करीत असतात. दुर्जनांची बुद्धी सज्जनांस कळली तर तो त्यांना सहकार्य करणार नाही. चोरांची सभा भरणे कधी शक्य नाही. कारण एक तर ते सारे एकाच जागी पकडले जातील. चौर्यकर्म मुळातच निषेधार्ह असल्याने ते चोरूनच केले जाते. उजळमाथ्याने नव्हे. गळ हा माशाचा काळ असतो. तो माशाकडूनच गिळला जाऊन नि:ष्प्रभ होऊ शकत नाही. तसेच रात्रीच्या वेळी अंधारातून पाऊलवाटेने जाणाऱ्या भित्र्या माणसाला 'वाजे पाऊल आपुले। म्हणे मागून कोण आले।' अशी स्वत:च्याच पावलांची भिती वाटत असते. असा माणूस खरोखरच्या पिशाच्चावर हल्ला करू शकेल का? नाही. हरणाच्या पाडसास जाळे कुरतडण्याची क्षमता नाही. अतिभव्य मेरू पर्वत ओलांडण्याचे सामर्थ्य मुंगीत नाही. कारण तिचा आकार-आयुष्य-वेग मर्यादित असल्याने तिला ते शक्य नाही. या सर्व गोष्टी घडणे जसे अशक्य आहे, तसेच जिवाचे मायापार होणे अशक्य आहे. विलक्षण उदाहरणांनी माऊलींनी ते स्पष्ट केले आहे. या उदाहरणाप्रमाणेच शेवटी एक उदाहरण - जे सर्वांच्या माहितीतील आहे, दिले आहे. विषयासक्त पुरुषास जशी स्त्री जिंकवत नाही, म्हणजे तिच्यापासून दूर राहता येत नाही. तशी ही मायानदी जिवास ओलांडता येत नाही. मूळात माऊलींनी सकाम शब्द वापरला आहे. तो कोणत्याही कामोपभोगाची इच्छा उत्पन्न झालेल्या पुरुषाचा निर्देश करतो.



याची असंख्य उदाहरणे जगाच्या पुराणातून - इतिहासातून आहेत. तशीच ती सांप्रत काळातही आहेत.

भक्तहो, आतापर्यंत आपण दुस्तर अशा मायानदीचे स्वरूप, जिवात्म्यांचे त्यातून तरुन जाण्याचे उपाय, स्वसामर्थ्यांवरचे ते उपायच कसे अपाय होतात, जिवांच्या स्वसामर्थ्यावर मायापार होणे कसे अशक्य आहे, याचे सोदाहरण विवेचन माऊलींनी केले. यावरून मायानदी तरून जाणे कदापि शक्य नाही, असे समजून निराश मात्र होऊ नका बरं! कारण प्रत्यक्ष परमेश्वरांनी ही मायानदी तरून जाण्याचे उपाय आपणास सांगितले आहेत. सेवेस घेतलेल्या श्लोकाचा दुसरा चरण तेच आपणास सांगत आहे. त्यातील गूढार्थ उकलून ज्ञानेश्वर माऊली पुढील ओवीत म्हणतात,

**एथ एकेचि लीला तरले। जे सर्वभावे मज भजले।**
**तया ऐलीच थडी सरले। मायाजळ।।९७।।**

येथे तेच सहजपणे तरुन जातात जे सर्वभावाने माझी भक्ती करतात. एवढेच नव्हे तर ते अलिकडच्या तिरावर असतानाच मायानदीचे पाणी नाहीसे होते.

पहा भक्तहो! केवढे आश्चर्य! एवढी दुस्तर मायानदी सहजपणे तरून जाण्याचा उपाय येथे ज्ञानेश्वर माऊलींनी उघड केला आहे. त्याचे इंगित 'सर्वभावे मज भजले' हे आहे. सर्वभावाने म्हणजे अनन्यभावाने भक्ती करणे होय. म्हणजेच ईश्वराव्यतिरिक्त अन्य काही नाही. तोच एक मला हवा आहे, अन्य काही नको. चर्मचक्षूंनी साकार रूप पाहावे, कानांनी परमेश्वरांचे कीर्तन ऐकावे, मुखाने त्यांच्या अवतारकार्याचे गुणगाण गावे, हातांनी त्याचेच काम करावे, पायांनी त्याच्यासाठीच हालचाल करावी, दिनरात मनाने त्याच्याशी अखंड एकरूप राहावे. सारे काही परमेश्वरासाठीच आणि स्वत:सही त्याचेच समजून पूजा करावी. अष्टसात्विक भावांनी त्याची पूजा बांधावी. मी ईश्वराचा असून त्याच्याच प्राप्तीसाठी या जगात आलो आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या प्राप्तीसाठीच मला मानवदेह लाभला आहे. प्रत्येक कर्म आणि अकर्मसुद्धा ईश्वरार्पण

बुद्धीने करून ते त्यालाच समर्पित करावे व दुष्कर्माकडे प्रवृत्ती होऊ देऊ नये. थोडक्यात, प्रगट व अप्रगट त्याचाच जप चालू ठेवावा. त्याच्याहून काहीही श्रेष्ठ नाही, असे मानून सर्वभावांनी सातत्याने भक्ती करणाऱ्यांसाठी अलिकडच्या तिरावरच मायाजळ नष्ट होते. हे असे कसे घडते? सर्वभावाने भक्ती करण्याची व त्यातून ज्ञानाच्या वाटेची कोण प्रेरणा देते ते पुढील ओवीत माऊली सांगतात,

**जया सद्‌गुरू तारू पुढे। जे अनुभवाचे कासे गाढे।**
**जया आत्मनिवेदन तरांडे। आकळले।।९८।।**

ज्यांना सद्‌गुरू हे नावाडी लाभले आहेत ज्यांची अनुभवाची कास अतिशय बळकट आहे. आणि ज्यांना आत्मनिवेदन हेच तारू सापडले आहे. जे आपल्या शिष्यास सद्‌वस्तूस म्हणजेच परमेश्वरास मिळवतात ते सद्‌गुरू. अशा सद्‌गुरूंची दीक्षा ज्यांना भक्तीच्या पुण्याईच्या जोरावर प्राप्त ते अतिशय भाग्यशाली होत. त्या दीक्षेमुळेच त्यांना परमेश्वरस्वरूपाचा अनुभव नश्वर देहात होतो. ते त्याचाच अंश असल्याचा दृढ साक्षात्कारही त्यांना होतो. त्यामुळे ते स्वत:स ईश्वरास अर्पण करतात. म्हणजे अनन्य भावाने त्याची भक्ती करतात. कारण भक्तीची ही युक्ती त्यांना सद्‌गुरू कृपेमुळे लाभलेली असते.

**जे अहंभावाचे ओझे सांडुनी।**
**विकल्पाचिया झुळका चुकावुनी।**
**अनुरागाचा निरूता होऊनी। पाणीढाळू।।९९।।**

जे अहंभावाचे ओझे टाकून, विकल्पाच्या वाऱ्याच्या झुळुका चुकवून, प्रपंचावरील अनुरागरूपी पाण्याच्या प्रवाहाची दिशा टाळतात.

आत्मनिवेदनाचे साधन ज्यांना सद्‌गुरूकृपेने प्राप्त होते, त्यांच्याच कृपेने त्या भक्तांचा अहंभाव नाहीसा होतो. हा 'अहं' भाव म्हणजे जिवाचे 'मी'पणा होय. 'मी आहे' यानंतर 'माझे आहे' सुरू होते. त्रिगुणांच्या कचाट्यात सापडलेला जीव हा प्रकृतीच्या कार्याचा बोझा विनाकारण



आपल्यावर घेतो. सारे प्रकृतीच करीत असते पण जीव अहंपणामुळे मी केले असे म्हणत असतो. 'हे माझे आहे' ही पुढची पायरी होय. सद्‌गुरू कृपेमुळे ज्यांना ब्रह्माचे यथार्थ ज्ञान झालेले असते, त्यांचा अहंपणा नाहीसा होतो. 'अहं' संपला की 'अहं'मधून निर्माण होणारी 'माझे' ही भावनाही संपुष्टात येते. त्यानंतरही विकल्पाचा वारा सुटतो. शंकाकुशंका उठतात, त्याही नष्ट कराव्या लागतात. प्रपंचप्रेमरूपी पाणी प्रवाहाची दिशा टाळून परमार्थाकडेच लक्ष ठेवावे लागते.

**जया ऐक्याचिया उतारा। बोधाचा जोडला तारा।**
**मग निवृत्तीचिया पैलतिरा। झेपावले जे।।१००।।**

जे जीव परमात्मा ऐक्य हाच उतार आहे, हे जाणून त्या उताराने, ज्ञानरूपी ताऱ्याच्या सोबतीने निवृत्तीच्या पलिकडिल तिराला जाऊन पोहचतात.

जीवब्रह्माचे ऐक्य हेच मायापार होणे होय. हे प्रत्यक्ष अनुभवाच्या टप्प्यात येऊ लागते. हाच उतार होय. प्रवृत्ती ऐलतीर, तर निवृत्ती पैलतीर होय. ज्ञानरूपी ताऱ्याच्या सोबतीने जे प्रपंचातून सुटून निवृत्तीच्या पैलतीरावर पोहचतात ते या निवृत्तीच्या पैलतीरावर पोहचताना आणखीही जालिम उपाय करतात ते या उपाय वर्णन करणाऱ्या शेवटच्या ओवीत अत्यंत मर्मग्राही पद्धीतीने सांगितले आहे. श्री. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**ते उपरतीच्या वावी सेलत। सोहंभावाचेनि थावे पेलत।**
**मग निघाले अनकळित। निवृत्तीतटी।।१०१।।**

ते वैराग्यरूपी हातांनी पाणी तोडति तोडीत 'मी तो आहे' या अनुभवाच्या बळाने स्वरूपस्थितीचा तोल सांभाळीत कोणत्याही संकटांची बाधा न होता, निवृत्तीच्या तिरावर मायानदीतून बाहेर येतात.

सारांशरूपासाठी आपण एक उदाहरण पाहू. आपणास एखादे दिव्य औषध एखाद्या बाटलीत भरून ठेवायचे आहे. आपण अडगळीतील एखादी बाटली शोधून काढतो. ती धुवून स्वच्छ करण्यासाठी आपण

तीमध्ये पाणी ओततो किंवा बादलीतील पाण्यात ती बुडवितो. त्यापूर्वी ती बाटली रिकामी असल्याची आपण खात्री केलेली असते. पण खरोखर ती बाटली रिकामी असते का? तर नाही. त्यामध्ये न दिसणारी – काठोकाठ भरलेली हवा असते. मग धूळ, जळमटे वगैरे असतात. ज्यावेळी आपण तीमध्ये पाणी भरतो त्यावेळी त्यामधील हवा निघून जाते. खळखळून पाणी ओतून टाकल्यावर जळमटे धूळ निघून जाते व दिव्य औषध भरण्यास सज्ज होते. त्याचप्रमाणे जीवब्रह्माचे ऐक्य घडण्यासाठी जीवरूपी बाटलीतून 'अहं' रूपी हवा काढून टाकावी लागते. आसक्ती, शंका-कुशंका काढून टाकाव्या लागतात.

वैराग्यरूप हात हेच निवृत्ती तटाकडे झेपावताना मायानदीत तरण्यास सामर्थ्यशाली ठरतात. ते हात मारीत 'तो मी आहे' किंवा 'ते ब्रह्म मी आहे' या दृढ भावनेने निवृत्तीच्या पैलतीलावर ते पोहचतात. म्हणजेच ते परमेश्वराशी एकरूप होतात. मग जिवात्मा हा जिवात्मा उरत नाही तर परमात्मा होतो. निवृत्तीरूप तट म्हणजेच परमात्मा होय. जेथून प्रवृत्ती उत्पन्न झाली आणि जीवदशा येऊन अलिकडे फेकलो गेलो. वर उल्लेखलेल्या उपायाने तिथेपर्यंत परत त्याच निवृत्ती तटापर्यंत जाणे म्हणजे मायापार होणे होय किंवा प्रवाहाच्या उलट पोहत जाऊन मायानदीचे उगमस्थान जे ब्रह्म तेथेपर्यंत पोहचणे होय. त्या ब्रह्मात पोहचल्यानंतर आनंद, आनंद आणि आनंदच आहे. जन्म-मृत्यु, जरा व्याधी-दु:ख ज्या मायेत आहेत त्याच्या पलिकडे सच्चिदानंद घन परमात्मा-परमेश्वर श्रीहरी आहेत.

भक्तहो, अशा रीतीने सेवेसाठी घेतलेल्या ओवीतील 'येणे उपाये मज भजले' या ओवीतील पहिल्या चरणातील आशयातील गूढार्थाचे विवेचन झाले. 'ते' हे माझी माया या दुसऱ्या चरणातील 'ते' म्हणजे जे उपाय ज्ञानोत्तर भक्तीचे उपाय करणारे हेही स्पष्ट झाले. 'हे माझी माया' अगदी आरंभापासून उपायांपर्यंत आपण विस्तारपूर्वक पाहिले. मायेचे स्वरूप-उगम-विस्तार-तिचा दुस्तरपणा-उपाय कसे अपाय ठरतात. मग कोणते उपाय मायानिरास करून मोक्षप्राप्ती करून देतात येथेपर्यंत स्पष्ट



झाले. आता सेवेसाठी घेतलेल्या ओवीचे तिसरे व चवथे चरण पहा – 'परि ऐसे भक्त विपाईले। बहुवस नाही।। – पण असे भक्त फारच थोडे असतात. खूप नसतात. असे म्हणण्याची वेळ श्रीहरीवर का यावी बरे? त्याचे कारण उघड आहे. आपण अंतरंगापेक्षा बाह्यांगास अधिक महत्त्व देतो. त्यामुळे खरा 'सद्गुरू' कोण आहे, हे आपण ओळखू शकत नाही. त्यामुळे त्याची प्राप्ती होत नाही. जो 'चमत्कार' करतो तोच सद्गुरू अशी असंख्यांची भावना असते. त्याच्या थाटमाटास ते भुलतात. आपणास निश्चित कोठे जायचे आहे, हे न ठरविता वाटचाल करू लागतो. त्यामुळे आपण निश्चित कोठेच पोहचत नाही.

म्हणून ज्ञानोत्तर भक्तीने, आणि तेही अनन्य भक्तीनेच – दृढ वैराग्याच्या जोरावर आपण तरून जाऊ शकतो. अशी भक्ती असली तर परमेश्वर स्वत:च आपणास मार्गदर्शन करतील. सेवेसाठी घेतलेली ओवी एकसलग अशी आहे.

**येणे उपाये मज भजले। ते हे माझी माया तरले।**
**परि ऐसे भक्त विपाईले। बहूवस नाही।। १०२।।**

संतसज्जन भक्तहो, धन्याचा हा 'माल', कण्हत कुंथत का होईना, या हमालाने आपणा भक्ताच्या घरात आणून दिला आहे. तो अंतरंगात ठसून जर श्रीहरी-परमेश्वरास भजले तर जिवात्मा हा जिवात्मा न राहता परमात्मा होईल, हे निश्चित. कारण खुद्द धन्याचेच हे उद्‌गार आहेत-

**येणे उपाये मज भजले। ते हे माझी माया तरले।**
**पुंडलिका वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम।।**

(१० फेब्रुवारी १९९९ रोजी, मणदूर, ता. शिराळा, जि. सांगली येथे श्री देवी शेवताई-मळाई मंदिरात, श्रीमद् गीता ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहातंर्गत देण्यात आलेले प्रवचन.)

○○○